# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

नवीन विषय/तुकडी/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा करिता

## जाहीर प्रगटन

### वृत्तपत्रातील संक्षिप्त जाहिर प्रगटनाचा सविस्तर तपशील

संदर्भ :– १) शासननिर्णय क्र एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि–४, दि. १३/०९/२०१७.

२) शासन निर्णय क्र एनजीसी २०२५/ई–१३१९८७८/मशि–४, दि. १८/०९/२०२५.

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड हे शैक्षणिक वर्ष २०२७–२८ करिता विद्यापीठ कार्यक्षेत्रातील (नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर जिल्हा)शैक्षणिक संस्थेकडून संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/तुकडी/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा इत्यादी सुरु करण्यासाठी संबंधीत संस्था/महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहे. सादर करावयाचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव/आवेदनपत्र, शासन निर्णय परिशिष्टांसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.srtmun.ac.in यावर Announcements / Circulars – Academic (Affiliation) Section मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व प्रस्ताव New College Permission System (NCPS) या ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार आहेत.

संस्था/महाविद्यालयांनी प्रस्ताव, सादर करतांना शासन निर्णयात नमुद परिशिष्ट 'अ' मध्ये विहीत केल्याप्रमाणे, विहीत शुल्कासह नुसार प्रस्तावा सोबत आवश्यक सर्व कागदपत्रे क्रमाने जोडुन ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची अंतिम तारीख **दि. ३०/०९/२०२६** ही आहे. अंतीम तारखेनंतर कोणतेही प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

तसेच, उच्च तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी संदर्भीय पत्र क्र. १ नुसार आपणास कळविण्यात येते की, बार काउन्सिल ऑफ इंडियाने त्यांच्या दि. १३/०८/२०२५ रोजीच्या प्रेस रिलिजनुसार, पुढील ३ वर्षे नवीन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. सबब, विस्तारीकरणांतर्गत विधी संदर्भातील नवीन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/नवीन तुकडी या संदर्भातील प्रस्तावाबाबत केवळ बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना–हरकत (NOC) प्रमाणपत्र सादर करणा–या संस्थांचे/महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९(३)(ग) नुसार स्विकारण्यात येणार आहेत.

शासन निर्णय क्र. एनजीसी २०२५/ई–१३१९८७८/मशि–४, दि. १८/०९/२०२५ नुसार संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/तुकडी/अभ्यास पाठयक्रम/ विद्याशाखा इत्यादीसाठी प्रस्ताव सादर करावेत व वेळोवेळीचे शासन निर्णय व निर्देश, विद्यापीठ अनुदान आयोग (विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्निकरण) विनियम २००९ नुसार नमूद केलेल्या विनियमातील तरतूदी संस्थेने मागणी करण्यापूर्वी विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयात नियमीत प्राचार्याची नियुक्ती, विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षक संख्या, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपलब्धता, आवश्यक अकृषक जमीन, विहीत क्षेत्रफळ असलेल्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि ईतर भौतिक सोईसुविधा इमारती, वीज, पाणी, स्वच्छतागृह इत्यादींची व्यवस्था, विनियमातील तरतूदीनुसार ग्रंथालय, प्रयोगशाळा, सभागृह, सुयोग्य फर्निचर, तासिकांसाठी खोल्यांची व्यवस्था, आर्थिक तरतुद, नॅक मुल्याकंन/पूनर्मुल्याकंन इत्यादी सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा/तुकडी यासाठी प्रस्ताव /आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी या बाबत खातरजमा करून घ्यावी.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९(४)(ग) नुसार संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/तुकडी/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी शासनाने New College Permission System (NCPS) ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. सदर प्रणालीची लिंक https://htedu.maharashtra.gov.in/NCPS/ अशी आहे. सर्व प्रस्ताव हे Online पध्दतीने आवश्यक प्रक्रिया शुल्कासह सादर करावे याची (शुल्क तक्ता संकेतस्थळावर उपलब्ध आहे.) संलग्निकरण शुल्क तक्त्यातील ७ क्रमांकानुसार प्रक्रिया शुल्क (Processing Fees) + प्रस्ताव शुल्क रु.२२००/– + १८ टक्के जीएसटी प्रमाणे विद्यापीठाच्या Online Payment Gateway UPI, Card, Net Banking, RTGS/NEFT/IMPS शुल्क भरणा करावे.

ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची हार्डकॉपी दोन प्रतीमध्ये परिशिष्ट 'अ' नुसार मुद्येनिहाय क्रमवार कागदपत्र जोडावीत त्यास अनुक्रमानिका, अनु क्र. द्यावा व पताका लावावेत तसेच प्रस्तावासोबतच्या सर्व छायांकित पानांवर साक्षांकन करून दि. ०१/१०/२०२६ पर्यंत विद्यापीठात सादर करावे.

संस्थेच्या प्राप्त प्रस्तावातील परिशिष्ट 'अ' नुसार छाननी समितीने पात्र केलेल्या प्रस्तावाकरिता पाहणी समिती पाठविण्यात येईल. वरील प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीमध्ये ऑफलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार नाहीत याची सर्व संबंधीतानी नोंद घ्यावी.

विद्यापीठ संकेतस्थळ : www.srtmun.ac.in

संदर्भ:–शैक्षणिक/संलग्न–०३/२०२६–२७/488

दिनांक : ३१/०८/२०२६

स्थळ : नांदेड

कुलसचिव